वर्तमानपत्रात प्रसिध्द झालेल्या विशेष श्रमसंस्कार शिबीराच्या बातम्या - २०२३-२४

राज्य दैनिक
रायगड स्वाभिमान
RNI : MAHMUL03868
संपादक : दिनेश चां. मोरे | मुख्य संपादक : रघुनाथ गणपत कडू | संपादक : किरण ल. मोरे
रविवार ०७ जानेवारी २०२४ | उप संपादक : रोहन रघुनाथ कडू | संपर्क : ८९८३२४२३४३

इंगळी येथे राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत विशेष श्रमसंस्कार शिबिर

कवि सरकार इंगळी | इंगळी येथे दिनांक ४ जानेवारी ते १० जानेवारी अखेर हुपरी येथील रयत शिक्षण संस्थेचे चंद्राबाई शांताप्पा शेंडूरे कॉलेज हुपरी राष्ट्रीय सेवा योजना शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांच्या माध्यमातून विशेष श्रमसंस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आले अजून या शिबिरात शिक्षक शिक्षिका सह कॉलेज मधील अनेक विद्यार्थी व विद्यार्थीनी यांनी सहभाग नोंदवाला आहे .

या शिबिरात रोज विविध प्रबोधन व संस्कृतीक कार्यक्रमाचे आयोजन केले जात आहे . यात बलशाही भारतासाठी बलशाही युवक ' वक्ते बाबासो नदाफ हेरवाड ' सर्वांगीन विकासासाठी समृधीची मानसिकता वक्ते डॉ विवेक कोतेकर कोल्हापूर अधुनिक शेती संवधन वक्ते किरण कांबळे जल व्यवस्थापन काळाची गरज वक्ते संभाजी गावडे स्वच्छ भारत स्वस्थ भारत वक्ते प्रा. डॉ. विजय माने सातारा यांचे व्याख्यान आयोजित केले आहे . त्याचपमाणे या कार्यक्रमात डॉ. संतोष बराले प्रा.डॉ. अरुण शिंदे प्रा. एस ए भंडारे . प्रा.डी.सी तुळशीकट्टी . प्रा. एम.एस मुजावर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थीत राहाणार आहेत त्याच प्रमाणे प्रबोधन संस्कृतीक कार्यक्रमाचे उद्घाटक मा किशोर शिंदे पोलिस निरीक्षक हुपरी यांचे हस्ते करण्यात येणार आहे यावेळी सरपंच दादासो मोरे उपसरपंच सौ सुमय्या नायकवडे ग्रामविकास अधिकारी एस .बी .हासुरे तसेच सर्व ग्रा प सदस्य यांची उपस्थीती असणार आहे .

इंगळी गावात गेल्या तीन दिवसांपासून शेकडो विद्यार्थी विद्यार्थिनी स्वच्छता अभियान राबविण्यात आले यावेळी सरपंच दादासो मोरे ' कवि सरकार इंगळी उपस्थितीत होते त्याचप्रमाणे रोज सांयकाळी विविध प्रबोधनात्म फेरी मनोरंजनात्मक कार्यक्रमाचे आयोजन केले जात आहे .

कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रा. डॉ डी.आर भोसले व प्रा डॉ. संध्या माने कोथळी सर सरपंच दादासो मोरे यांनी पर्यत्न केले आहे.

शेंडुरे महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे शिबिर संपन्न

दै. विदर्भ सत्यजित
कवी सरकार
विशेष बातमी
इंगळी

दैनिक
विदर्भ सत्यजित
आपला संभाजी नगर
शनिवार १३ जानेवारी २०२४

सकाळ

शेंडुरे महाविद्यालयाचे इंगळीत श्रमसंस्कार शिबिर

हुपरी, ता. १७ : येथील चंद्राबाई शेंडुरे महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेंतर्गत इंगळी येथे विशेष श्रमसंस्कार शिबिर झाले. शिवाजी विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक प्रा. डॉ. तानाजी चौगुले प्रमुख उपस्थित होते. अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. सुरेश आपटे होते.

डॉ. चौगुले यांनी सहभागी विद्यार्थ्यांचे कौतुक करून शिबिराच्या माध्यमातून झालेले संस्कार आयुष्य घडविण्यास मदत करतात, असे मत व्यक्त केले. प्रा. डॉ. आपटे, प्रभारी प्राचार्य प्रा. डॉ. डी. आर. भोसले, इंगळी ग्रामपंचायत सदस्या चंद्रकला मगदूम, उमेश मगदूम आदींनी मनोगत व्यक्त केले.

प्रा. बाबासाहेब नदाफ (बलशाली भारतासाठी बलशाली युवक), डॉ. विवेक कोतेकर (सर्वांगीण विकासासाठी समृद्धीची मानसिकता), किरण कांबळे (आधुनिक शेती संवर्धन), प्रा. डॉ. संभाजी गावडे (जलव्यवस्थापन : काळाची गरज) आणि प्रा. डॉ. विजय माने (स्वच्छ भारत-स्वस्थ भारत) आदींची व्याख्याने झाली.

शिबिरांतर्गत स्वच्छतापूरक कार्यक्रम, तसेच निसर्ग वाचवा-पृथ्वी वाचवा लघुपट, मतदार साक्षरता या विषयावरील पथनाट्य सादरीकरण झाले. राष्ट्रीय एकात्मता, स्वच्छता व जल व्यवस्थापन रॅली काढली. कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. संध्या माने यांनी प्रास्ताविक केले. ऋतुजा कांबळे हिने सूत्रसंचालन केले. प्रा. डॉ. आय. एच. मुल्ला यांनी आभार मानले.

Kolhapur, Kopjilha
18/01/2024 Page No. 4

ऑनलाईन प्रसिध्द झालेल्या विशेष श्रमसंस्कार शिबीराच्या बातमीची लिंक

https://youtu.be/mpvl९QO५_po